0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.०४/१०/२०११ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा.८०२, दि. ०५/१०/२०११, २०/१०/२०११, ०१/११/२०११ व २४/११/२०११.

३) या कार्यालयाची "अंतरिम आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा.८०३ दि.०५/१०/२०११

४) गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल यांचे टपालामार्फत प्राप्त दि.२२/०९/२०११ व २९/०९/२०११ चे निवेदन.

५) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे यांचे दि.१७/१०/२०११ रोजीचे अभिवेदन.

६) गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल व ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांचे दि.१८/१०/२०११ रोजीचे निवेदन.

७) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे यांचे टपालामार्फत प्राप्त दि.२५/१०/२०११ व १८/११/२०११ रोजीचे अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा. ४०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- २७ /०१/२०१२.

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

मानखूर्द पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उप निरिक्षक श्री. अरुण पांडूरंग कदम हे दिनांक ०७/०९/२०११ रोजी त्यांच्या पथकासह मानखुर्द पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त करीत असतांना त्यांना त्यांच्या विश्वसनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथून संध्याकाळी एक मोटार ट्रक रेशनिंग दुकानांवर विक्रीसाठी वापरण्यात येणारा गहू बेकायदेशिरपणे इतर ठिकाणी विक्रीसाठी घेऊन जाणार आहे. सदर बातमीच्या आधारे सुमारे १७:३० वाजता एक मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा संशयास्पदरित्या मंगलमूर्ती जंक्शनजवळ, घाटकोपर मानखूर्द लिंक रोड या ठिकाणी आढळून आला. सदर मोटार ट्रकची त्यांनी पहाणी केली असता, सदरच्या ट्रकमध्ये गव्हाने भरलेल्या गोणी सापडल्या. सदर बातमीदारामार्फतीने मिळालेल्या बातमीप्रमाणे

शहानिशा झाल्याने सदरचा मोटार ट्रक हा ताब्यात घेऊन मानखुर्द पोलिस ठाणे अंमलदार पोलिस उप निरिक्षक श्री. चंदनशिवे यांच्या ताब्यात दिला.

तद्नंतर श्री. सुनिल रसाळ, सहाय्यक पोलिस निरिक्षक, मानखूर्द पोलिस ठाणे यांनी शिधावाटप कार्यालय क्र. ४४ ई चे शिधावाटप अधिकारी श्री. दयाराम पिराजी भानावत यांना भ्रमणध्वनीवर माहिती दिली की, मानखूर्द पोलिस ठाणे येथे टाटा ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणारा १२० बाचके गहू घेऊन जात असतांना पकडून ठेवला असून सदर ठिकाणी त्यांना हजर राहण्यास सांगितले. सदरचे अधिकारी त्यांच्या सहकाऱ्यांसह उपस्थित राहिले असता, सदरचा ट्रक चॉकलेटी रंगाचा असून निळ्या रंगाच्या ताडपत्रीने आच्छादलेला असल्याचे त्यांना आढळले, त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्याचा १२० बाचके गहू असल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी उपस्थित असलेला ट्रकचा चालक यास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव विदेशी राममिलन गौतम असे सांगून चिता हॉटेलच्या पाठीमागे, कामराज नगर पोलिस चौकीच्या गल्लीत, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे राहत असल्याचे सांगितले. ट्रकमधील गव्हाबाबत चालकाकडे चौकशी केली असता, त्याच्या ओळखीचे प्रदीप शेठ यांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याच्या ड्रायव्हरची तब्येत ठिक नसल्याने खोपोली येथील कंपनीमध्ये सदर गहू घेऊन जाण्यास सांगितले. सदर गहू घेऊन जात असतांना पोलिसांनी अडविले व मानखुर्द पोलिस ठाणे येथे घेऊन आल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या खरेदी बाबत चौकशी केली असता, गुप्ता ट्रेडिंग कंपनी, ३ कामराज नगर, जी.आर. नं. एस/२१, ईसीआय चर्च जवळ, घाटकोपर (पूर्व) येथून आणल्याचे इनव्हाईस क्रमांक २० दाखविले. ट्रकमधील गव्हाची अधिकाऱ्यांनी पहाणी केली असता, सदर गव्हाच्या गोण्यांवर भारतीय अन्न महामंडळ (एफ.सी.आय.) छापलेले आढळले. प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेला मुद्देमाल मानखूर्द पोलिस ठाणे यांनी सिलबंद करुन तसा पंचनामा पोलिसांनी केलेला आहे.

अशाप्रकारे संबंधितानी संगणमत करुन सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरीत होणारा गहू हा अवैध मार्गाने खरेदी करुन काळ्याबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८ व ९ (२) दि बॉम्बे रेशनिग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज (रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन) ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७ व ८ तसेच (३) दि महाराष्ट्र फुड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन १९६६ चे कलम १८(३)(एएए) चा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था. गु. क्र. ११२९/२०११ दि.१७/०९/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टाटा कंपनीचा मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ | १ नग | ५,००,०००/- |
| २ | उक्त ट्रकमधील १२० बाचके गव्हाचा साठा | ५९६० किलो | ८०,४६०/- |
| | | एकूण | ५,८०,४६०/- |

सबब, उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप, अंमलबजावणी यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि.१८/१०/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली होती.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस मानखूर्द पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी श्री. सुनिल रसाळ हे उपस्थित राहिले व त्यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. सदर सुनावणीस गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल व ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक प्रदिप मोतीलाल अग्रवाल हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे चालक उपस्थित नव्हते. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांना पुढील तपासा संबंधी लेखी अभिवेदन सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दि.२५/१०/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखूर्द पोलिस ठाणे यांचे दि.१८/११/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, दिनांक १४/०९/२०११ रोजी गव्हाचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी पोलिस ठाण्यात दिलेल्या जबाबानुसार त्यांनी सदरचा गहू हा विकण्यासाठी संजू ट्रेडिंग कंपनी, खोपोली यांना पाठविला असल्याचे सांगितले आहे. सबब, संजु ट्रेडिंग कंपनी यांना तसेच दि.२५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस अनुपस्थित संबंधिताना त्यांचे लेखी व मौखिक म्हणणे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दि.१८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, अंतीम सुनावणी दि.०७/१२/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०११ रोजीच्या अंतीम सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी अथवा आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. तथापी, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखूर्द पोलिस ठाणे यांचे वाचावे क्र. ७ अन्वये टपालामार्फत प्राप्त लेखी अभिवेदनात, घटनास्थळी केलेल्या पंचनाम्यात १२० बाचके गव्हाचा साठा

(५९६० किलो) नमूद असल्याने या कार्यालयाचे पारीत करण्यात आलेल्या अंतरीम आदेशामध्ये १२० बाचके नमूद आहे. तथापी, प्रत्यक्षात अंतरीम आदेशानुसार जप्त गव्हाच्या साठ्याचे विल्हेवाटीच्या वेळेस पोलिसांना सदरच्या ट्रकमध्ये २०९ गव्हाचे बाचके (९६६० किलो) आढळून आले. तसेच पोलिसांच्या तपासात खोपोली येथे संजू ट्रेडिंग कंपनी या नावाची आस्थापना प्रत्यक्षात दिलेल्या भेटीत नमूद पत्त्यावर आढळून आले नाही.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

**युक्तिवाद :-**

गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल यांचे दि.२२/०९/२०११ रोजीच्या निवेदनात, तो गुप्ता ट्रेडिंग कंपनीचा मालक असून मानखूर्द पोलिस ठोणेमध्ये जप्त गहू साठा हा त्याच्या मालकी हक्काचा आहे. सदरचा गहू फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून खरेदी केलेला आहे. पुरावा म्हणून त्याने फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांचेकडून खरेदी केल्याची छायांकित प्रत सादर केली. तरी त्याचा गव्हाचा साठा त्याला त्वरीत परत देण्याबाबत आदेश पारीत करावे अशी विनंती केली. तसेच दि.२९/०९/२०११ रोजीच्या निवेदनात, पोलिस ठाण्यात असलेला जप्त गव्हाचा साठा हा नाशवंत असल्याने सदरचा पदार्थ काही काळ तसाच राहिल्यास सदरचा गहू खराब होऊन त्याचे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्या कारणाने त्याचा गव्हाचा साठा त्याला परत मिळण्याबाबत पुन्हा विनंती केली.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी युक्तीवाद केला की, त्याने यापूर्वी जप्त गव्हाचा साठा परत मिळणेकरिता अर्ज सादर केलेले आहे मानखूर्द पोलिस ठाणे येथील गुन्हा नोंद क्र. ११२९/११ मध्ये जप्त गहू हा त्याचा आहे. त्यासाठी त्याने फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून खरेदी केलेल्या बिलाची मुळ प्रत सादर केली व छायांकित प्रत सोबत जोडली आहे. पोलिस ठाणेत फिर्याद दाखल करणारे अधिकारी श्री. दयाराम पिराजी भानावत (शिधावाटप अधिकारी ४४ ई) यांनी अपूर्ण कारवाई करुन गुन्हा नोंद केला आहे. त्याची मुळ कारणे पुढील प्रमाणे आहेत. १) ड्रायव्हरने उपलब्ध गुप्ता ट्रेडिंग कंपनीच्या नमूद केलेल्या पत्त्यावर भेट देऊन अधिक माहिती घेणे आवश्यक होते. परंतू श्री. भानावत यांनी असे न करता एकतर्फी कारवाई केली आहे. २) श्री. भानावत यांनी फक्त गव्हाच्या गोण्यावर भारतीय अन्न महामंडळ (फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) छापले असल्याकारणाने गुन्हा नोंद केला. ३) भारतीय अन्न महामंडळ (फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) खुल्या बाजारातील गव्हाची विक्री करतात याची माहिती श्री. भानावत यांना असून ही त्यांनी गुन्हा नोंद करुन एकतर्फी कारवाई केली आहे. तरी त्याच्या अर्जाचा सहानभुतीपूर्वक विचार करुन योग्य

आदेश पारित करावेत व त्याचा गहू त्याला परत देण्याबाबत आदेश पारित करावेत, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मानखूर्द पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी श्री. सुनिल रसाळ यांनी युक्तीवाद केला की, दि.१७/०९/२०११ रोजी मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चा चालक विदेशी राममिलन गौतम यास अटक करण्यात येऊन त्याचेकडे केलेल्या तपासामध्ये त्याने सदरची गाडी व गाडीमधील माल हा प्रदिप शेठ याचा असल्याचे सांगितले व त्याने दिलेल्या माहितीवरुन प्रदिप मोतीलाल अग्रवाल यास अटक करुन त्याचेकडे तपास केला असता, त्याने सदरचा ट्रक हा त्याच्या मालकीचा असल्याचे सांगून ट्रकमधील गव्हाचा साठा हा लालजी केदारनाथ जयस्वाल याचा असल्याचे सांगितले. दि.१४/०९/२०११ रोजी गव्हांचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल यांना पोलिस ठाण्यात आणले असता त्यांनी त्यांचेजवळ असलेल्या गहू खरेदी केलेली मुळ कागदपत्रे दाखविली व गाडीतील माल गहू हा त्यांचा असल्याचे सांगितले. तसेच त्याने सदरचा माल हा त्याचे ताब्यात मिळण्यासाठी मा. नियंत्रक, नागरी पुरवठा यांचे कार्यालयात अर्ज केला असल्याचे सांगितले व कागदपत्रे दाखविली. तसेच त्यांनी सदरचा गहू हा विकण्यासाठी संजू ट्रेडिंग कंपनी, खोपोली येथे पाठविला होता असे सांगितल्याने लालजी जयस्वालचा जबाब घेण्यात आलेला आहे. लालजी जयसवालने दिलेल्या माहितीची शहानिशा गुप्तपणे चालू आहे. लालजी जयस्वाल याने दिलेल्या जबाबाच्या आक्षेपार्ह माहिती मिळून येताच त्यास अटक करीत आहे. सबब, गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे, असे सांगून तसे वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांचे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक १८/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांनी युक्तीवाद केला की, वाहन क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा त्याचा मालकीचा असून त्याने सदरचा मोटार वाहन गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. लालजी के. जयस्वाल यांचा गहू खोपोली येथे ट्रान्सपोर्ट करता दिलेला होता. गव्हाबाबत झालेल्या गुन्हा नोंदमध्ये त्याचा काहीही संबंध नाही. त्याचा मोटार वाहन पोलिस ठाणेस उभा असल्यामुळे त्याला आर्थिक रुपाने अडचणी निर्माण होत आहे व त्याचा परिवार हा मोटर वाहनावर निर्भर असून, त्याला त्याचे मोटर वाहन देण्यात यावे, अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक मानखुर्द पोलिस ठाणे यांनी टपालामार्फत सादर केलेल्या दि.२५/१०/२०११ व १८/११/२०११ रोजीच्या लेखी अभिवेदनात, जप्त करण्यात आलेला गहू हा चालकाने सादर केलेल्या बिलावर १२० गव्हाची बाजकी वजन ५९६० किलो असल्याचे नमूद केलेले होते. परंतू प्रत्यक्षात २०९ गव्हाची बाजकी वजन ९६६० किलो असा गहू मिळून आल्याने मा. नियंत्रक शिधावाटप व संचालक, चर्चगेट, मुंबई यांचे आदेशाने दि.२२/१०/२०११ रोजी जप्त गहू हा रेशनिंग दुकानदारांना वाटप करुन ६३,९०८/- रुपये सरकारी तिजोरीत भरणा केला आहे. प्रस्तूत गुन्ह्यात ट्रक चालक विदेशी राममिलन गौतम यास दि.१७/०९/२०११ रोजी व ट्रान्सपोर्टर प्रदीप

मोतीलाल अगरवाल यास दि.०७/१०/२०११ रोजी अटक करण्यात आली असून ते सध्या जामिनावर मुक्त आहेत. प्रस्तूत गुन्ह्यात दि.१४/११/२०११ रोजी गव्हाचे मालक असल्याचे सांगणारे व बिल सादर करणारे लालजी केदारनाथ जयस्वाल यास दि.१४/११/२०११ रोजी अटक करण्यात आली. मा. न्यायालयाने तपासाकरिता दि.१६/११/२०११ पर्यंत पोलिस कोठडी मंजूर केली. पोलिस कोठडी दरम्यान अटक आरोपी लालजी जयस्वाल व पोलिस पथकासह खोपोली येथे जावून त्याने त्याचे जबाबात तसेच त्याने सादर केलेल्या बिलामध्ये जप्त गहू हा खोपोली येथील संजू ट्रेडिंग कंपनी येथे विक्रीकरिता घेवून जात असल्याचे सांगितल्याने खोपोलीत संजू ट्रेडिंग कंपनीचा शोध घेतला. परंतू सदर ट्रेडिंग कंपनी मिळून आली नाही. अटक आरोपी लालजी जयस्वाल याने तपासामध्ये सहकार्य न करता तो पोलिसांची दिशाभूल करीत असल्याने अटक आरोपी लालजी जयस्वाल याने पोलिसांनी जप्त केलेला गहू कोठून खरेदी केला, गहू कोणाला विकणार होता, अटक आरोपीचे अणखीन कोणी साथीदार आहेत किंवा कसे, तसेच त्याचे इतर पोलिस ठाण्यात अशाप्रकारचे गुन्हे नोंद आहेत किंवा कसे, याचा तपास होणे महत्त्वाचे असल्याने अटक आरोपीची पोलिस कोठडी मुदत वाढवून मिळण्यासाठी दि.१६/११/२०११ रोजी मा. कोर्टास विनंती केली. परंतू मा. कोर्टाने अटक आरोपी लालजी जयस्वाल यास न्यायालयीन कोठडी ताब्यात घेतलेने अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्ह्याचे तपासादरम्यान खोपोली येथे संजू ट्रेडिंग कंपनी हि अस्तीत्वात नसल्याने संजू ट्रेडिंग कंपनीच्या मालकावर नोटीस बजावणी करता आली नाही, असे नमूद केले आहे.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मानखूर्द पोलिस ठाणेचे सहाय्यक पोलिस उप निरिक्षक श्री. अरुण पांडूरंग कदम हे दिनांक ०७/०९/२०११ रोजी त्यांच्या पथकासह मानखुर्द पोलिस ठाण्याच्या हद्दीत गस्त करीत असतांना त्यांना त्यांच्या विश्वसनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, घाटकोपर मानखुर्द लिंक रोड येथून संध्याकाळी एक मोटार ट्रक रेशनिंग दुकानांवर विक्रीसाठी वापरण्यात येणारा गहू बेकायदेशिरपणे इतर ठिकाणी विक्रीसाठी घेऊन जाणार आहे. सदर बातमीच्या आधारे सुमारे १७:३० वाजता एक मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा संशयास्पदरित्या मंगलमूर्ती जंक्शनजवळ, घाटकोपर मानखूर्द लिंक रोड या ठिकाणी आढळून आला. सदर मोटार ट्रकची त्यांनी पहाणी केली असता, सदरच्या ट्रकमध्ये गव्हाने भरलेल्या गोणी सापडल्या. सदर बातमीदारामार्फतीने मिळालेल्या बातमीप्रमाणे शहानिशा झाल्याने सदरचा मोटार ट्रक हा ताब्यात घेऊन मानखूर्द पोलिस ठाणे अंमलदार पोलिस उप निरिक्षक श्री. चंदनशिवे यांच्या ताब्यात दिला. तद्नंतर श्री. सुनिल रसाळ, सहाय्यक पोलिस निरिक्षक, मानखूर्द

पोलिस ठाणे यांनी शिधावाटप कार्यालय क्र. ४४ ई चे शिधावाटप अधिकारी श्री. दयाराम पिराजी भानावत यांना भ्रमणध्वनीवर माहिती दिली की, मानखूर्द पोलिस ठाणे येथे टाटा ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत होणारा १२० बाचके गहू घेऊन जात असतांना पकडून ठेवला असून सदर ठिकाणी त्यांना हजर राहण्यास सांगितले. सदरचे अधिकारी त्यांच्या सहकाऱ्यांसह उपस्थित राहिले असता, सदरचा ट्रक चॉकलेटी रंगाचा असून निळ्या रंगाच्या ताडपत्रीने आच्छादलेला असल्याचे त्यांना आढळले, त्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्याचा १२० बाचके गहू असल्याचे आढळून आले. सदर ठिकाणी उपस्थित असलेला ट्रकचा चालक याने त्याचे नाव विदेशी राममिलन गौतम असे सांगून चिता हॉटेलच्या पाठीमागे, कामराज नगर पोलिस चौकीच्या गल्लीत, घाटकोपर (पूर्व), मुंबई येथे राहत असल्याचे सांगितले. ट्रकमधील गव्हाबाबत चालकाकडे चौकशी केली असता, त्याच्या ओळखीचे प्रदीप शेठ यांनी त्याच्या मोबाईलवर संपर्क साधून त्याच्या ड्रायव्हरची तब्येत ठिक नसल्याने खोपोली येथील कंपनीमध्ये सदर गहू घेऊन जाण्यास सांगितले. सदर गहू घेऊन जात असतांना पोलिसांनी अडविले व मानखुर्द पोलिस ठाणे येथे घेऊन आल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी सदर गव्हाच्या खरेदी बाबत चौकशी केली असता, गुप्ता ट्रेडिंग कंपनी, ३ कामराज नगर, जी.आर. नं. एस/२१, ईसीआय चर्च जवळ, घाटकोपर (पूर्व) येथून आणल्याचे इनव्हाईस क्रमांक २० दाखविले. ट्रकमधील गव्हाची अधिकाऱ्यांनी पहाणी केली असता, सदर गव्हाच्या गोण्यांवर भारतीय अन्न महामंडळ (एफ.सी.आय.) छापलेले आढळले. प्रस्तूत प्रकरणी जप्त केलेला मुद्देमाल मानखूर्द पोलिस ठाणे यांनी सिलबंद करुन तसा पंचनामा पोलिसांनी केलेला आहे. अशाप्रकारे संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन एक ट्रक व १२० बाजके (५९६० किलो) गव्हाचा साठा असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तदनंतर वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखूर्द पोलिस ठाणे यांनी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, घटनास्थळी केलेल्या पंचनाम्यात १२० बाचके गव्हाचा साठा (५९६० किलो) नमूद असल्याने या कार्यालयाने पारीत करण्यात आलेल्या अंतरीम आदेशामध्ये १२० बाचके नमूद आहे. तथापी, अंतरीम आदेशानुसार जप्त गव्हाच्या साठ्याचे विल्हेवाटीच्या वेळेस पोलिसांना सदरच्या ट्रकमध्ये प्रत्यक्षात २०९ गव्हाचे बाचके (९६६० किलो) आढळून आले असून पोलिसांनी २०९ गव्हाचे बाचक्यांची अंतरीम आदेशामध्ये निर्देशित केल्यानुसार अधिकृत शिधावाटप दुकानास वाटप करुन विल्हेवाट लावण्यात आल्याचे नमूद केले आहे.

लालजी केदारनाथ जयस्वाल हे अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४ ई/२११ या त्यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या रेशन दुकानातून अवैधरित्या २१८ पोती गव्हाचा साठा गैरमार्गाने विक्री व पुरवठा करीत असतांना आढळून आल्याने त्यांचेविरुध्द वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथेही गु.र.क्र. II ४८/२०११ दि. २८/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद आहे.

0008 गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल याने सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्याने जप्त गव्हाचा साठ्याबाबत त्याने फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया यांच्याकडून खरेदी केलेल्या दि.१६/०२/२०११ रोजीच्या बिलाची छायांकित प्रत सादर केली व शिधावाटप अधिकारी श्री. भानावत यांनी फक्त गव्हाच्या गोण्यावर भारतीय अन्न महामंडळ (फुड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) छापले असल्याकारणाने गुन्हा नोंद केला आहे, असे नमूद केले आहे. तथापी, सदरचे बिल दि.१६/०२/२०११ रोजीचे असून त्यावर १७६ गव्हाचे बाचक्यांमध्ये ८९९१.२४० किलो साठा असल्याचे नमूद आहे. प्रत्यक्षात घटनास्थळी २०९ गव्हाचे बाचके जप्त करण्यात आले असून त्याचे वजन ९६६० किलो असल्याचे पोलिसांनी विल्हेवाटीच्या अहवालामध्ये नमूद केले आहे. तसेच लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी सदर गव्हाचा साठा खोपोली येथील संजू ट्रेडिंग कंपनी यास विकण्यासाठी पाठविला असल्याचे तपासात आढळून आले आहे. तथापी, पोलिसांनी खोपोली येथील दिलेल्या प्रत्यक्ष भेटीत संजू ट्रेडिंग नावाची कंपनी नमूद पत्त्यावर अस्तित्वात नसल्याचे आढळून आले आहे. यावरुन लालजी केदारनाथ जयस्वाल यांनी पोलिसांना व सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या निवेदनात तथ्य नसून त्यांचे निवेदन व त्यासोबतचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता ते दिशाभूल करणारे असून प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा गहू अवैध मार्गाने खरेदी करुन काळाबाजाराने विक्री करण्याकरिता घेऊन जात असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. यावरुन सर्व संबंधितांनी शासनाने शिधापत्रिकेव्दारे अधिकृत शिधावाटप दुकानातून शिधापत्रिकाधारंकाना वाटप करण्यासाठी अनुदानित दराने उपलब्ध करुन दिलेला शासन नियंत्रीत गहू शिधापत्रिकाधारंकाना वितरीत न करता बेकायदेशीररित्या मिळवून परस्पर संगणमत करुन काळाबाजार व जादा नफेखोरीच्या उद्देशाने खरेदी, विक्री व वाहतूक केली असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जप्त गव्हाच्या साठ्यासंदर्भात पारित करण्यात आलेले अंतरिम आदेश क्र. निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६५/२०११/जा.८०३, दिनांक ०५/१०/२०११ कायम करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांचे विरुध्द वाशी पोलिस ठाणे, नवी मुंबई येथेही गु.र.क्र. II ४८/२०११ दि. २८/१०/२०११ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून या प्रकरणी त्यांनी लालजी केदारनाथ जयस्वाल यांच्याशी संगणमत करुन लालजी केदारनाथ जयस्वाल यांच्या पत्नीच्या नावे असलेल्या अधिकृत शिधावाटप दुकान क्र. ३४( ई/२११ या रेशन दुकानातून अवैधरित्या २१८ पोती गव्हाचा साठा ट्रक क्र. एमएच-११-अेएल-५४८८ यामधून गैरमार्गाने विक्री व पुरवठा करीत असतांना आढळून आले आहे.

तसेच प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चा चालक विदेशी राममिलन गौतम याने घटनास्थळी दिलेल्या जबाबात व तपासामध्ये, त्याने सदरची गाडी व गाडीमधील माल हा प्रदिप शेठ याचा असल्याचे सांगितले. ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांनी

सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, वाहन क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा त्याचा मालकीचा असून त्याने सदरचा मोटार वाहन गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक श्री. लालजी के. जयस्वाल यांचा गहू खोपोली येथे ट्रान्सपोर्ट करता दिलेला होता. गव्हाबाबत झालेल्या गुन्हा नोंदमध्ये त्याचा काहीही संबंध नाही, असे नमूद केले आहे. तथापी, प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व दिशाभूल करणारे असून सदरचा जप्त गव्हाचा साठा हा शासन नियंत्रित दराचा असल्याचे माहित असून सुध्दा त्यांनी लालजी केदारनाथ जयस्वाल यांच्याशी संगणमत करुन अवैधरित्या वाहतूक केल्याचे सिध्द होत आहे. यावरुन ट्रक मालक प्रदिप मोतीलाल अग्रवाल यांचा सदर गुन्हा नोंद प्रकरणी प्रत्यक्ष सहभाग असल्याचे निष्पन्न होत आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ)(क) मधील तरतुदीनुसार सदरचा जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा त्याच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्याच्या अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई येथे स्था. गु. क्र. ११२९/२०११ दि.१७/०९/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला २०९ गव्हाचे बाचके (९६६० किलो) शासनजमा करण्यात येऊन या कार्यालयाचे दिनांक ०५/१०/२०११ रोजीचे अंतरिम आदेश कायम करण्यात येत आहे.

२) जप्त करण्यात आलेला ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ हा शासनजमा करण्यात येत आहे. सदर ट्रकची बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास ट्रकचा मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरचा ट्रक त्याच्या मालकास परत करण्यात यावा व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी ट्रकच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

३) अथवा ट्रक मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या ट्रकची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचा ट्रक लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "८४४८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे मालक
२) मोटार ट्रक क्र. एमएच-४३-यु-१९२२ चे चालक विदेशी राममिलन गौतम
३) प्रदीप शेठ, जप्त गव्हाचे मालक
४) गुप्ता ट्रेडिंग कंपनीचे मालक लालजी केदारनाथ जयस्वाल
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, मानखुर्द पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) उपनियंत्रक शिधावाटप, ई परिमंडळ, वडाळा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई. यांना माहितीसाठी अग्रेषित.

४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय यांना माहितीकरीता.

५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.